ISSN 2319-8648

UGC Approved Journal
Sr. No. 64310

Impact Factor - 2.143

Pre-Reviewed

Indexed (IIJIF)

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Special Issue

Issue I, Vol II 10th March 2018

Godavari Manar Charitable Trust's

## Arts, Commerce & Science College, Shankarnagar

Tq. Biloli, Dist. Nanded

(NAAC Re-accredited 'B' Grade with CGPA 2.31 & ISO- 9001-2008)

One Day Interdisciplinary National Conference
on

## Globalization and Welfare States: Problems and Prospects

Jointly Organized by
Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded
&
Public Administration Association Maharashtra

Organized by
Department of Public Administration
Arts, Commerce & Science College, Shankarnagar

Editor In Chief
Mr. Arun B. Godam
Latur.

Convener
Dr. B. S. Pimple
Principal, ACS College, Shankarnagar &
President, Public Administration Association Maharashtra

Co-Convener
Dr. S. K. Lekhane
(HOD Pub. Adm.)

Coordinator
Dr. A. C. Sonkamble
(Asso. Prof. Pub. Adm.)

www.rjournals.co.in

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 18 | जागतिकीकरण, सामाजिक न्याय आणि बालकामगार | प्रा. पेरके वैशाली शेषराव<br>डॉ. सुधाकर श्रीरामे | 53 |
| 19 | "जागतीकीकरण व आरक्षण धोरण : एक अभ्यास" | प्रा. डॉ. श्यामसुंदर वाघमारे. | 57 |
| 20 | जागतिकीकरण व आरक्षण धोरण | प्रा.डॉ.शंकर गड्डमवार | 60 |
| 21 | कल्याणकारी राज्य व समाजकल्याण प्रशासन | डॉ. सोनकांबळे ए.सी. | 63 |
| 22 | जागतिकीकरण आणि कल्याणकारी राज्य | डॉ. एन. पी. कुडकेकर<br>डॉ. व्यंकट विळेगावे | 65 |
| 23 | जागतिकीकरण आणि वाढती विषमता : | डॉ. गजानन देवराव चिट्टेवाड | 68 |
| 24 | समाजकल्याण व राष्ट्रीय आरोग्य धोरण- २०१७ : एक विश्लेषण | प्रा. डॉ. एकंबेकर पी. के.<br>प्रा. संजय मारोतराव देबडे | 72 |
| 25 | जागतिकीकरणाचा भारतीय ग्रामीण समाज जीवनावरील प्रभाव | प्रा.विलास गायकवाड | 77 |
| 26 | जागतिकीकरणात आरक्षण धोरणाची प्रासंगिकता | डॉ. भालेराव जे.के. | 80 |
| 27 | जागतिकीकरण व कल्याणकारी राज्याच्या संदर्भात : संतसाहित्य | प्रा.डॉ.शरचंद्र देगलूरकर | 83 |
| 28 | जागतिकीकरण आणि दुर्बल घटक | प्रा. इरलापल्ले पी.बी. | 86 |
| 29 | "जागतिकीकरण व कल्याणकारी राज्य" | प्रा.डॉ.शंकर लेखने<br>प्रा.जी.व्ही.पांचाळ | 88 |
| 30 | जागतिकीकरण व कल्याणकारी राज्य | प्रा.डॉ.अशोक टिपरसे | 91 |
| 31 | समाज कल्याण कार्यक्रमात राज्य सरकारची भुमिका व कार्य | प्रा. जीवन एकनाथराव चव्हाण | 94 |
| 32 | "कल्याणकारी राजकारण आणि दुर्बल घटक" | काठेवाडे पुंडलिक माधवराव | 97 |
| 33 | जागतिकीकरण, सामाजिक न्याय आणि बालकामगार | प्रा. पेरके वैशाली शेषराव | 100 |
| 34 | कल्याणकारी राज्य व सामाजिक न्याय | प्रा. डॉ. अशोक नारायण गायकवाड | 104 |





Scanned with CamScanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue
Issue I Vol. II , 10th March 2018
UGC Approved
Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143

# "जागतिकीकरण व कल्याणकारी राज्य"

**प्रा.डॉ.शंकर लेखने**
(लोकप्रशासन विभाग प्रमुख), कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर
**प्रा.जी.व्ही.पांचाळ**
(रसायनशास्त्र विभाग) , कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर

------------- (29) -------------

**प्रस्तावना**

'प्रत्येक डोळयातील अश्रू पुसण्याची जबाबदारी पार पाडते ते कल्याणकारी राज्य', हे विधान आहे महात्मा गांधी यांचे. कल्याणकारी राज्य निर्मितीसाठी शासनाला नेमकी कोणती कार्ये करावी लागतात त्याचा व्यापक आशय उपरोक्त विधानातून आपणास स्पष्ट होतो. मुळात राज्य ही संस्थाच मानव कल्याण डोळयासमोर ठेवून झाली आहे. व्यक्तींच्या जीवीताचे व मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी सामाजिक करारातून जी राज्य ही संस्था उदयास आली ती लोककल्याणाच्या भावनेतूनच. परंतु कल्याणकारी राज्य ही संकल्पना मोठी व्यापक व मूल्याधिष्ठित आहे. जनतेच्या सुखासाठी व त्यांच्या कल्याणासाठी राज्याने कटीबध्द राहून त्यांना अधिकाधिक चांगले जीवन प्रदान करावे हे या संकल्पनेत अंतभूर्त आहे. 'जॉर्ज वॉटसन हा कल्याणकारी राज्याच्या सिध्दांताचा फार मोठा समर्थक आहे. त्याने व्यक्तीवादी सिध्दांत अमान्य केला आहे. आर्थिक क्षेत्रातील स्पर्धेवर नियंत्रण ठेवून संपत्तीचे न्याय पध्दतीने विरतण झाले पाहिजे. प्रत्येक मनुष्याला जगण्यासाठी आवश्यक ती साधन सामुग्री मिळाली पाहिजे. बेकारी, मजुरांच्या कामाचे तास उत्पादनाच्या साधनांची वाढ आणि वस्तूच्या किंमतीवर नियंत्रण अशा व्यापक स्वरूपाच्या सामाजिक सेवाची तरतुद कल्याणकारी राज्यामध्ये करण्यात यावी व नागरिकांचे सर्वोतोपरी रक्षण करावे, असे या सिध्दांतात अभिप्रेत आहे.[१]

कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शासनाने समाजवादी व लोककल्याणकारी राज्यासाठी आपल्या धोरणांची निश्चिती केल्याचे दिसून येते. मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून संपत्तीचे न्याय वितरण व्हावे यासाठी एक महत्वाचे पाऊल टाकले होते. भांडवलदार वर्गावर काही प्रमाणात या धोरणामुळे नियंत्रण ठेवण्यात आले होते.

'सामाजिक न्यायासाठी सरकारला अर्थव्यवस्थेवर नियंत्रण ठेवावे लागते असे कल्याणकारी राज्याचे समर्थक सांगतात. उत्पादन वाढीपेक्षा होणाऱ्या उत्पादनाच्या वाटपावर ते अधिक भर देतात.'[२]

शासनाचे हे धोरण मात्र १९९० नंतर स्वीकारलेल्या नवीन आर्थिक धोरणामुळे कालबाह्य ठरले. जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यामुळे भांडवलदार व कारखानदार वर्गावरील निर्बंध नाहिशे झाले. परवाना मुक्त व्यवस्था निर्माण झाली आणि खुली व मुक्त अर्थव्यवस्था अस्तित्वात आली आहे. अशा वेळी शासनाच्या भूमिकेने कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेपासून फारकत घेतली आहे का ? खुल्या अर्थव्यवस्थेच्या बाजाराभिमुख व्यवस्थेत कल्याणकारी राज्याच्या मूल्यात्मक बाबींशी मेळ घालण्यात शासन यशस्वी होत आहे किंवा नाही ? या अनुषंगाने प्रस्तुत लेखातून मांडणी करण्यात आली आहे.

**संशोधन लेखाचा उद्देश -**

जागतिकीकरण व कल्याणकारी राज्य या संकल्पनांचा आशय जाणून घेणे आणि जागतिकीकरणाचा कल्याणकारी राज्याच्या भूमिकेवर काय परिणाम झाला आहे याचा उहापोह करणे हा या लेखाचा उद्देश आहे.

**तथ्य संकलन -** प्रस्तुत संशोधन लेखाची मांडणी वर्णनात्मक स्वरूपाची आहे. यासाठी तथ्य संकलनाच्या दुय्यम श्रोतांचा म्हणजेच विषयाशी संबंधीत संदर्भ ग्रंथाचा, तज्ज्ञाच्या लेखांचा, विविध अहवालाचा वापर करण्यात आला आहे.

**संकल्पनांचा अर्थ -**



Scanned with CamScanner

कल्याणकारी राज्य - 'असे राज्य किंवा सरकार जे संधीची समानता, व्यक्तीची प्रतिष्ठा तसेच संपत्तीचे वाटप यांना केंद्रस्थानी ठेवून लोकांच्या सामाजिक, आर्थिक सुरक्षेविषयी आणि त्यांच्या विकासासाठी निरंतर प्रयत्नशील असते त्यांना कल्याणकारी राज्य असे म्हणतात.'[३]

'वेलफेअर स्टेट' ही संकल्पना १९४२ साली विलियम टॅम्पल त्यांच्या 'Christianity and social order' या पुस्तकातून लोकप्रिय झाली असे मानले जाते. त्यापुर्वी ही संकल्पना 'Social State ' या नावाने ओळखली जात असे. त्याही पूर्वी सन १८४५ साली बैंजामिन डिजरायली यांच्या 'Sybil : or the two nations' कादंबरीमध्ये लोकांच्या सामाजिक कल्याणाच्या हेतूने प्रेरित राज्याच्या भूमिकेसाठी ही संकल्पना वापरण्यात आली होती.'[४]

उपरोक्त अर्थ पाहिल्यानंतर आपणास हे लक्षात येते की, लोकांच्या हितासाठी व सुखासाठी आवश्यक त्या सर्व कार्याची जबाबदारी शासनावर असते व ही जबाबदारी पार पाडण्यास शासन प्रयत्नशील असते.

**जागतिकीकरण -**

'जागतिकीकरणाच्या संकल्पनेत प्रामुख्याने खुल्या व्यापारी व्यवस्थेचे, देशा-देशातील अनिर्बंध बाजार व्यवस्थेचे समर्थन केले जाते.' 'परवानायुक्त' व्यवस्था जागतिकीकरणात केंद्रभूत असते. त्यामुळे साहजिकच केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अशा विविध क्षेत्रातील विचारांचे, आचारांचे आदान प्रदान होणे अपरिहार्य बनते.'[५]

**संकलित तथ्यांचे आशय विश्लेषण -**

नवीन आर्थिक धोरणांचा अपरिहार्यपणे अंगीकार करणे शासनाला तत्कालिन परिस्थितीत गरजेचे होते. परंतु या धोरणांचा स्वीकार केल्यानंतर भांडवलदार वर्ग अनिर्बंध होणार आणि संपत्तींचे केंद्रीकरण होणार हे निश्चित होते. अशावेळी देशातील बहूसंख्य सामान्य लोकांच्या विकासाचे प्रश्न सोडवून त्यांना उच्च दर्जाचे जीवनमान प्रदान करण्यासाठी शासनानी कोणते उपाय केले आणि कल्याणकारी राज्य व जागतिकीकरण यांच्यात तळमेळ घालण्यात कितपत यशस्वी झाले हे तपासून पाहणे गरजेचे आहे.

जागतिकीकरणाच्या धोरणाने भारतीय समाजावर नेमके काय परिणाम झाले आहेत या विषयी कुलगुरू डॉ.नागनाथ कोतापल्ले यांच्या 'भारतीय समाज, स्वातंत्र्य आणि साहित्य' या वैचारिक लेखातील पुढील परिच्छेद पुरेसा प्रकाश टाकण्यास उपयुक्त आहे. त्यांच्यामते, "एकेकाळी भारतामध्ये पब्लिक सेक्टर आणि प्रायव्हेट सेक्टर असा ताळमेळ घालण्यात आलेला होता. कल्याणकारी राज्य ही संकल्पना त्यातूनच उदयास आली होती. परंतू जागतिकीकरणाचा रोडरोलर फिरू लागला आणि कल्याणकारी राज्य ही संकल्पना त्याखाली चिरडून गेली. ज्या देशामध्ये प्रचंड अशा प्रकारची विषमता असते, दारिद्र्य असते आणि अज्ञानाचे डोंगर उभे असतात तेथे जागतिकीकरण किती फलदायी होऊ शकते हा प्रश्न आहे. परिणामतः जागतिकीकरणानंतरच्या कालखंडात उद्योगपतींची संपत्ती कित्येक पटीनी वाढली आणि भारताची सुजलाम सुफलाम् भूमी उध्दवस्त होत गेली. १९९० नंतर देशभरातील तीन लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, त्यातील सर्वाधिक आत्महत्या महाराष्ट्रातील आहेत. भारत सरकारच्याच एका अहवाला प्रमाणे या देशातील सत्तर टक्के लोकांचे उत्पन्न केवळ २०/- रु. आहे. इतकी विषमता वाढली आणि आमचा देश असंख्य अंतर्विरोधाने ग्रासून गेला आहे. परंतु स्मार्ट सीटी करणाऱ्यांना याचे भान नाही. त्यांची धोरणे उद्योगपतींच्या संपतीत वाढ होईल अशीच आहेत. देशातील श्रमिक आणि पारंपरिक शोषित माणूस निराश्रित होतो आहे. कामगारांचे संरक्षण काढून घेतले जात आहे. तसेच रिकाम्या जागा न भरण्याचे धोरणही रेटले जात आहे."[६]

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत कल्याणकारी राज्याची भूमिका कशी मागे पडत चालली आहे याचा विविधांगी विचार उपरोक्त परिच्छेदातून आपणास दिसून येतो.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून विविध देशातील तंत्रज्ञानांचा, वस्तुंचा, सेवांचा लाभ एकमेकांना घेणे शक्य होत असले तरी त्याची दुसरी बाजू जी अपेक्षित घटकांना दूर्लक्षित करते ती कल्याणकारी भूमिकेला अडसर ठरणारी आहे. ॲडमिरल विष्णु भागवत यांच्याच शब्दात सांगायचे म्हणजे, "जागतिकीकरण या तत्वाची निश्चितच काही अशी वैशिष्ट्ये आहेत की, ज्यामुळे काही समाज घटकात परस्पर हित विरोधी



Scanned with CamScanner

संघर्ष निर्माण होतो आणि या प्रक्रियेत संबंधित देशामध्ये सेवा आणि उत्पादने यांचा मुक्त असा प्रवाह सुसाट वेगाने प्रवेश करतो. परंतू त्यातून त्या देशातल्या जनतेचे काय भले होणार आहे ? कोणते हीत साधले जाणार आहे ? याचा फारसा विचार केला गेलेला नसतो."[७]

जागतिकीकरणाचा अंगिकार करून आता जवळ-जवळ तीन दशके होत आहेत. एवढ्या प्रदीर्घ काळानंतर कल्याणकारी राज्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या मूलभूत गरजा, शिक्षण, आरोग्य, रोजगार, शेती उद्योगासाठी पायाभूत सुविधा यासारख्या बाबींचा जरी विचार केला तरी आपण या प्रक्रियेत सामान्य माणसाच्या प्रश्नांची आजही प्रभावी पणे सोडवणूक करण्यास असमर्थ ठरलो आहोत.

आज भारतातील सामान्य माणसाच्या समोरील आर्थिक अडचणी कोणत्या आहेत याची यादी केल्यास आपणास दिसून येते की, 'बेरोजगारीत वाढ होत आहे, रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत नाहीत, जीवनावश्क वस्तुंच्या किंमती वाढत आहेत, मोठ्या शहरात राहण्यासाठी घरे मिळत नाहीत, बालकांचे कुपोषण होत आहे, पाणी पुरवठा नीट होत नाही, वीज पुरवठा पुरेसा नाही, खेड्यात औषध, उपचाराची नीट सोय नाही, शिक्षण चांगले मिळत नाही आणि परवडत नाही, वाहतूक व्यवस्था नीट नाही'[८] अशा असंख्य समस्या आहेत ज्या शासनाच्या कल्याणकारी भूमिकेपासून अलिप्त होत चाललेल्या धोरणाचे प्रकटीकरण करत आहेत.

**निष्कर्ष व सारांश -**

जागतिकीकरणाच्या धोरणाचा अंगीकार केल्यानंतर बड्या उद्योजकांचे आणि बहुराष्ट्रीय कंपन्याचे भले होत चालले आहे. आर्थिक केंद्रीकरण झाल्यामुळे देशातील सामान्य नागरिकांचे प्रश्न, मूलभूत गरजा यांची प्रभावीपणे पुर्तता होत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे कल्याणकारी राज्याच्या अनुषंगाने राज्याची जी कर्तव्य व जबाबदाऱ्या आहेत त्यापासून शासन अंग काढून घेत आहे. खाजगीकरणावर भर देऊन सार्वजनिक क्षेत्राचे आकुंचन करत आहे, जे कल्याणकारी राज्य निर्मितीसाठी पोषक नाही.

**संदर्भ -**

१. लक्ष्मण कोतापल्ले, भारतीतील सामाजिक कल्याण प्रशासन व समाजकार्य, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१४, पृ.२७.
२. ना.य.डोळे, उदारीकरण : नवे आर्थिक धोरण, विद्या प्रकाशन, नागपुर, १९९७, पृ.१५१.
३. सुरेंद्र भटारिया, लोकप्रशासन - पारिभाषिक कोश, नेशनल पब्लिशींग हाऊस, जयपूर, २०१४, पृ.५७७.
४. उपरोक्त, पृ.५७८.
५. उरोक्त, पृ.२१५.
६. नागोराव कुंभार (संपा.), विचारशलाका, जोड अंक, १२२ ते १२५, ऑक्टो. १७ ते ऑक्टों.१८ पृ. २२५.
७. ॲडमिरल विष्णू भागवत, जागतिकीकरण नवीन गुलामगीरी, समता प्रकाशन, नागपूर, तृतीय आवृत्ती- २००७.
८. ना.य.डोळे, उपरोक्त, पृ.१५४.



Scanned with CamScanner